# “नवरत्नमाला स्तोत्र”

## (परिचय)

**प. पू. स्वामी पूर्णानंद (अमळनेर, जळगाव)**

*(परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या ‘नवरत्नमाला स्तोत्र’ या प्रसिद्ध स्तोत्रावर आधारित परमपूज्य सद्‌गुरु श्री बापट गुरुजी यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या “नवरत्नमाला स्तोत्र : संपूर्ण अर्थ व विवेचन” या पुस्तकाचा प पू स्वामी पूर्णानंद, अमळनेर यांनी लिहिलेला रसग्रहणवजा लेख)*

महाराष्ट्र भूमी ही ‘संत-पंत-तंत’ यांची सुपीक भूमी आहे. आद्य मराठी कवी मुकुंदराजांपासून अद्यावधी ही थोर संतकवी परंपरा अखंड सुरु आहे. गेल्या हजार वर्षात महान अवतारी विभूतींनी अक्षर वाङ्‌मयधन निर्माण केले; तसेच त्यावर अधिकार वाणीने भाष्य करणारे टीकाकारही जन्मास आले. मराठी भाषा तत्वज्ञान, साक्षात्कारी अनुभूती आणि सौंदर्यपूर्ण काव्यमय अविष्कार, या त्रिवेणीत न्हाऊन निघाली. त्या  ग्रंथांच्या आधारे बहुमोल जीवन घडवणारे लक्ष लक्ष साधक जन्मास आले. याचा गोड शेवट हिंदवी स्वराज्यात झाला. अवघ्या एकविसाव्या वर्षी साधना, सिद्धी, देशाटन, अक्षर साहित्याची निर्मिती करून योगियां दुर्लभ संजीवन समाधी घेणारा युवक भारताच्या अन्य भागात वा जगाच्या पाठीवर कुठे जन्मास झाला का?

महाराष्ट्राच्या उज्ज्वल अध्यात्मिक परंपरेत वारकरी, महानुभाव, श्रीदत्त, नाथ आणि समर्थ या पाच संप्रदायांनी साधना-विज्ञानाची उज्ज्वल परंपरा निर्माण केली. या संप्रदायांनी उच्च कोटीची साहित्य निर्मिती, साधना सिद्धी व तत्वचर्चा असा परम पावन त्रिवेणी संगम निर्माण केला. संत तुलसीदास त्रिवेणी संगम स्नानाचे महत्व सांगतात “त्रिवेणीत स्नान करणारा कावळा, कोकीळ बनतो आणि बगळा हा राजहंसपदास जातो”

परमपूज्य प्रातःस्मरणीय अर्वाचीन दत्तावतार श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज यांनी केवळ ११ मराठी श्लोकाचे “नवरत्नमाला स्तोत्र’ २१ व्या चातुर्मासात पिठापूर या दत्तक्षेत्री रचले. नुकत्याच झालेल्या १३ जुलै २०१४ रोजीच्या गुरुपौर्णिमेस स्वनाम धन्य प. पू. गुरुवर्य वा. वा. बापट गुरुजींची या स्तोत्रावर ‘संपूर्ण अर्थ व विवेचनपर टीका’ प्रकाशित झाली. या ग्रंथाचे ठळक विशेष म्हणजे ज्ञान-विज्ञान, प्रपंच–परमार्थ, व्यष्टी–समष्टी या दंद्वांचे निरसन पूर्वक सर्वस्तरीय वाचकांना समाधान देईल अशी अलौकिक प्रातिभ शैली! त्यातच गुरुकृपेचा परीस-स्पर्श! दोन पृष्टांवरील छापील

फक्त ११ श्लोक! त्यावर ५ प्रकरणे व १५२ पृष्ठे!! गुरुजींनी पिंजून पिंजून अर्थ काढला आहे. तो पंडितांना तसेच उपासकांनाही प्रेरक वाटावा; अद्वैत सगुणभक्तीची वाट गवसावी.

एका प्रसंगाच्या निमित्ताने स्वयं श्रीदत्त प्रभूंनी श्रीवासुदेवानंद महाराजांना कडक सोवळ्यावर थोडी मर्यादा घालण्याचा स्वप्नात आदेश दिला. श्री महाराज ह्या स्तोत्रात आम्हास आदेश देतात की, “देहाच्या पलीकडे जा आणि हे ज्ञान समजून घ्या”(पृ.२३) सत्याचा शोध घेणे, हे या स्तोत्राचे मूळ उद्दिष्ट होय. अध्यात्म आणि विज्ञान या दोहोंचे प्रमुख व एकमेव ध्येय म्हणजे “सत्याचा शोध’, सुमारे ३ ते ४ हजार वर्षांपूर्वी आमच्या वैशेषिक दर्शनकारांनी “अणू-रेणूचा” सिद्धांत मांडला. तोच आजच्या वैज्ञानिकांनी थोड्या वेगळ्या भाषेत मांडला आहे. बापट गुरुजी वैज्ञानिक अध्यात्मवादाचे चिंतक आहेत. त्यांच्या मते भौतिक विज्ञान हे मुक्ती न देता उलट बंधनात अडकवते! तर अध्यात्म विज्ञान आम्हास ’विमोचक’, मुक्तिदायक ठरते. ’आत्मज्ञान’ हा वरील दोन्हीपेक्षा वेगळा व परमोच्च शोध म्हणावा लागेल. या स्तोत्र भाष्यात गुरुजींनी देहाची नक्षरता, षड्-विकार, अद्वैत तत्त्वज्ञानातील विवर्तवाद, विकारवाद, मायावाद, सदोदित साक्षित्त्व साधना, अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय कोशांचे स्वरूप व विकास प्रक्रिया इत्यादी महत्त्वपूर्ण वेदान्त विषयांवर मार्मिक विवेचन करून सामान्य असंस्कृतज्ञ जनांवर मोठे उपकार केले आहेत. अमृतालाही पैजां जिंकणाऱ्या ज्ञानदेवांच्या ’माय मराठीत’ हा सारा स्वर्णिम तत्त्वबोध सुलभ करून ठेवला आहे!

तात्त्विक संकल्पनांच्या विवेचनात श्रीगुरुजी अशी मार्मिक उदाहरणे देतात की सारा बौद्धिक गुंता त्वरित सुटून ’मुक्तीचा’ आनंद प्रत्ययास येतो. स्थलाभावी एक-दोन उदाहरणे पाहू या. उदाहरणार्थ ’कूटस्थ’ ही तात्त्विक कल्पना स्पष्ट करताना श्री गुरुजी म्हणतात, “समजा राजाचा एक दरबार आहे. त्या दरबारात नृत्य सुरु आहे. दरबार राजाचा असला तरी राजा काही त्या दरबारी नृत्यात सहभागी होत नाही. तो फक्त बघत असतो, बाकी काही नाही. त्याच प्रमाणे आपल्या जीवन नाट्यात सुद्धा ’कूटस्थ’ हा कधीही सहभागी होत नसतो. तो अलिप्तपणे केवळ चैतन्य पुरविण्याचे काम करित असतो. कारण तो त्याचा सहज धर्म आहे.”

असेच एक दुसरे उदाहरण गुरुजी देतात- “पोस्टमन दिवसाला किती सुखाची, दुःखाची पत्रे वितरित करतो, पण तो पत्रांच्या मजकुरात अजिबात लिप्त नसतो! तद्वत हे कूटस्थ चैतन्य सुद्धा उदासीन असते. रस्त्यावरचा दिवा सुद्धा समोरून पालखी मिरवणूक, प्रेतयात्रा वा चौर्यकर्म या घटनांत फक्त प्रकाश पुरविण्याची जबाबदारी पार पाडतो”. या मार्मिक उदाहरणांनी वेदान्तातील ’कूटस्थ’ ही

क्लिष्ट संकल्पना एकदम लख्ख प्रकाशित होते व वाचकास वेगळाच बोधात्मक उल्हास व आल्ल्हाद प्राप्त करून देते. अशी अनेक उदाहरणे वाचकांनी मूळ ग्रंथ वाचून 'बोध रवीचा' प्रकाश लुटावा.

नवरत्नमाला" ग्रंथाची भाषा साधी, सोपी, प्रासादिक आहे; पण तीत केवढा गहन गंभीर अर्थ सुप्त-गुप्त आहे! हे भाष्य वाचताना एक सुखद विचार मनात आला.... आपल्या गीतेचा अर्थ लोकांना कळेनासा झाला आहे म्हणून स्वयं भगवान श्रीकृष्णच श्री ज्ञानदेव रूपात आले व त्यांनी 'ज्ञानेश्वरी' द्वारा ते मूळ ठेवणे प्रकट केले. तद्वतच थोरले महाराज श्री वासुदेवानंद स्वामी यांना आपल्या समग्र अक्षर वाङ्मयाचा रहस्यार्थ सामान्यांपुढे प्रकट करण्यासाठी पूज्यश्री बापट गुरुजींच्या लेखणीत प्रकट व्हावे लागले, असं आमचा आतला आवाज (inner voice) सांगतो. अन्यथा हे समग्र दिव्य ज्ञान व्यर्थ ठरले असते.

प्रबुद्ध वाचकांनी या ग्रंथातील आपल्या व्यक्तिमत्त्वाचे पाचही समर्थ पैलू- अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय कोश- समजून घेऊन ते सुविकसित करावे; 'नराचा नारायण व्हावे' व आपले 'हरपले श्रेय' पुनश्च हस्तगत करावे. इति.

स्वामी पूर्णानंद

केशवनगर, अमळनेर (जळगाव)

**"नवरत्नमाला स्तोत्र" मूळ रचनाकार प.पू. श्री वासुदेवानंद स्वामी (टेंबे) महाराज.**

**प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४**

**भाष्यकार परम पूज्य सद्गुरु श्री वासुदेव वामन बापट गुरुजी, बदलापूर.**

**पृ.१५२ : किंमत रु १५०/-**

www.bookganga.com

9869157308/9867040121